संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)

**जनसंपर्क विभाग**

---

## विद्या विषयक लेखा परीक्षण पॅनल चर्चेचे आयोजन १६ डिसेंबर रोजी

## संलग्नित महाविद्यालयांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन

## शैक्षणिक सत्र २०२१-२२ पासून लागू होणार

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे विद्या विषयक लेखा परीक्षण शैक्षणिक सत्र २०२१-२२ पासून करण्यात येणार असून त्या संदर्भात विद्या विषयक लेखा परीक्षण पॅनल चर्चेचे आयोजन दि. १६ डिसेंबर, २०२० रोजी दुपारी १२.३० वाजता युट्युबवर ऑनलाईन करण्यात आले आहे. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.एफ.सी. रघुवंशी हे अध्यक्षस्थानी असतील.

विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांना संलग्निकरण देण्याकरीता विद्या विषयक लेखा परीक्षण समिती यापुढे भेट देवून महाविद्यालयांची पाहणी करेल. त्यासाठी निश्चित केलेल्या गुणानुसार गुण देवून त्यावर विद्यापीठाद्वारे संलग्निकरण दिले जाणार आहे. महाविद्यालयातील शिक्षण, संशोधन, अध्ययन, शिक्षणेत्तर उपक्रम, भौतिक सुविधा, शैक्षणिक प्रक्रिया, विद्यार्थी सहभाग, विविध समाजोपयोगी उपक्रम आदी पॅरॅमिटर समितीकडून तपासले जातील. नॅक, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विचारात घेवून विद्या विषयक लेखा परीक्षण होणार आहे, त्यामुळे महाविद्यालयंची नॅकची तयारी सुद्धा या माध्यमातून होण्यास हातभार लागणार आहे. या विद्या विषयक लेखा परीक्षणामुळे महाविद्यालयांच्या दर्जात वाढ होण्यास सुद्धा मोलाची मदत होणार आहे.

या संदर्भात यापूर्वी विद्यापीठाद्वारे विद्या विषयक लेखा परीक्षणाबाबत प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते, त्यामध्ये प्रश्नोत्तरे मागविण्यात आली होती, त्यावर चर्चेप्रसंगी प्रश्नांना विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.एफ.सी. रघुवंशी, मानवविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. अविनाश मोहरील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.डी.डब्ल्यु. निचित, आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ.सौ.एम.पी. काळे, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, प्राचार्य डॉ.ए.बी. मराठे उत्तरे देवून निराकरण करतील. महाविद्यालयीन विभागाच्या उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील संचालन करणार असून प्रास्ताविक विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. तुषार देशमुख करतील. सहभागी होण्यासाठी https://www.youtube.com/channel/UCQINdMuEjWDqi9-3UkzOpeA ही युटच्युब लिंक असून ती विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर सुद्धा उपलब्ध करुन दिलेली आहे. तरी संलग्नित महाविद्यालयांनी मोठ्या संख्येने या चर्चेत सहभागी व्हावे, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी केले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. १५/१२/२०२०.

दै............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी